**MHKO050001932012**

<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ३२७/२०१२ मधील</u>
<u>निशाणी क्र.८७ खालील आदेश</u>
संदीप सिताराम पाटील वि. सिताराम गोपाळ पाटील

१. प्रतिवादीं क्र. ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११४ प्रमाणे निशाणी ६० वरील आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासंदर्भात दिलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. ५ अर्जात कथन करतात की, नि. ६० वर केलेला आदेश हा एकतर्फी आदेश पारीत केलेला आहे. प्रतिवादी क्र ५ पुढे असेही कथन करतात की, वादी क्र. १ ते ३ व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे संगनमत असुन केवळ प्रवितादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र ५ यांचे कडुन घेतलेले कर्ज बुडवण्याचे हेतुने दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र १ यांनी रेंदाळ सहकारी बॅक लि. रेदाळ यांचे विरुध्द सहकार न्यायालय क्र. २ कोल्हापूर येथे एमसीसी केस नं. ३९५/२००९ दावा दाखल केला होता व तो दावा गुणदोषावर अंशता मंजुर करण्यात आला होता आणि प्रतिवादी क्र. १ यांनी मागणी केलेली सन २००८ साली कर्जमाफ केलेल्या सुपुर्ण सभासदाची यादी हजर करण्याबाबतचा अर्ज नामंजुर केला होता. त्या आदेशाच्या विरुध्द प्रतिवादी क्र १ यांनी मा. उच्च् न्यायालय मुबंई यांचेकडे रिट अर्ज क्र ३५९३/२०१३ दाखल केला होता व तो रिट अर्ज मा. उच्च् न्यायालयानी फेटाळून लावला आहे. नि. ६० चा अर्ज हा कामामध्ये दिरंगाई होण्याच्या उद्देशाने दाखल केलेला आहे. त्यामुळे मा. न्यायालयाने केलेल्या आदेशाचा फेरविचार होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्जातील आदेश बाजुला सारुन सदर अर्जाचा फेरविचार होणेची विनंती प्रतिवादी क्र. ५ यांनी केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जावर म्हणणे देऊन प्रस्तुतच्या अर्जातील कथने नाकारलेली आहेत. वादी यांचे असे कथन आहे की प्रतिवादी क्र ५ यांना प्रसतुतचा अर्ज

दाखल करण्याचा अधिकार नाही म्हणुन तो अर्ज नांमजुर करावा.

४. दोनही बाजूंच्या विज्ञीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, निशाणी ६० वरील आदेशाचे अवलोकन केले असता, त्या आदेशामध्ये अभिलेखाबाबत सकृतदर्शनी दिसणारी अशी कोणतीही चुक अथवा दोष आढळून येत नाही. प्रतिवादी क्र ५ ने प्रस्तुत अर्जामध्ये निशाणी ६० च्या आदेशावेळी शासनाने २००८ साली कर्ज माफी केलेल्या सभासदाची यादी मागितलेली आहे. प्रतिवादी क्र १ यांच्या कथनाप्रमाणे त्याला शासनाने कर्ज माफ केलेले आहे. त्यामुळे सदरची बाब शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र १ यांच्यावर आहे. वर नमुद केल्याप्रमाणे अभिलेखावर अशी कोणताही सकृतदर्शनी चुक अथवा दोष आढळून येत नाही. त्यामुळे निशाणी ६० च्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्याची मला आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अर्ज निशाणी क्र.८७ नामंजुर करण्यात येतो.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

*(खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला)*

सही/-

**दिनांकः १९/०१/२०२४** **(संजय दि.वानखेडे)**
इचलकरंजी. **५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**इचलकरंजी.**